# खवय्येगिरीच्या किश्शांनी रंगलं 'मानाचं पान'

## सुधीर गाडगीळ यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



### कधीही पैशांचा मोह धरला नाही...

■ पुण्यात आल्यावर चार रुपये पगारावर एका हॉटेलमध्ये काम केले. टेबल साफ केले. स्वत:चे हॉटेल सुरू केले. मात्र, कधीही पैशाचा मोह धरला नाही. त्यामुळेच अद्यापपर्यंत कधी हॉटेलमध्ये पैशाच्या गल्ल्यावर बसलो नाही. नेहमी ग्राहकांना पुरविण्यात येणारी सेवा, स्वच्छता आणि पदार्थांची चव यावर लक्ष दिले. ग्राहकांशी मैत्री केली आणि प्रेम दिले, असे रूपाली व वैशाली हॉटेलचे मालक जगन्नाथ शेट्टी यांनी सांगितले.

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) – हॉटेलमध्ये एकटा बसून खाणारा माणून कसा माणूसघाणा वाटतो, बोलण्याचं, पाहण्याचं आणि वागण्याचं खाण्याशी काय नात असतं याबरोबरच रिमा लागू जेवताना तीन–चार हिरव्या मिरच्या कशा खातात, पूर्वीचे गोव्याचे मुख्यमंत्री आणि सध्याचे केंद्रीय मंत्री मनोहर पर्रिकर कोणताही प्रोटोकॉल न पाळता हॉटेलात बैठक मारून मासे कसे चापतात आणि मासे न खाणाऱ्याला कसे झापतात, कोण काय खातं, हे जाणून घेताना सुधीर गाडगीळ यांनी किती खाल्लं असेल, अशा एक ना अनेक खवय्येगिरीच्या किश्शांनी आज 'मानाचं पान' रंगलं.

ज्येष्ठ निवेदक सुधीर गाडगीळ लिखित 'मानाचं पान' या पुस्तकाचे प्रकाशन रूपाली आणि वैशाली हॉटेलचे मालक जगन्नाथ शेट्टी यांच्या हस्ते झाले. अर्थतज्ज्ञ आणि खाद्यपदार्थांचे जाणकार प्रदीप आपटे, बुद्धिबळपट्टू अभिजित कुंटे, बुकगंगाचे मंदार जोगळेकर, चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील आदी यावेळी उपस्थित होते. कोण काय खातं, कोणाला काय खायला आवडतं, या विषयावर गाडगीळ यांनी लिहिलेल्या 'मानाचं पान' पुस्तकावर प्रकाशन सोहळ्यात उपस्थित सर्वच खवय्यांनी आपल्या खाण्यासंदर्भातील किस्से सांगत यथेच्छ 'ताव' मारला.

आपल्याकडे चक्रधर स्वामी काय खात होते, संत ज्ञानेश्वरांना काय खायला आवडायचे, याचे संदर्भ आहेत. मात्र, त्यांच्यानंतरच्या महापुरुषांना खायला काय आवडत होते, याचा कुठेही उल्लख नाही. संतांनी खाणं हे प्रतीक ठेवून वाङ्मयनिर्मिती केली, असे आपटे यांनी सांगितले. दरम्यान, दुसरा काय खातो, या उत्सुकतेनेच खाण्याची आवड वाढते, असेही त्यांनी सांगितले.

पाहण्याचा, बोलण्याचा आणि वागण्याचा खाण्याशी काय संबंध असतो, हे सांगत सिनेमा, नाटकाला आणि खाण्याला एकटे जाणे ही कमालच आहे. चार लोकांना घेऊन गप्पा मारत खाणारी माणसे मनमोकळी असतात. शरद पवारांना आवडणारा मासा आमच्या खाणावळीत मिळतो, अशी जाहिरात करणारी खानावळही आहे. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख वेगवेगळे चवीष्ट पदार्थ चाखण्यासाठी कसे हॉटेल हुडकत होते, असे अनेक किस्से गाडगीळ यांनी सांगितले.